# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ७५ वा ❑ शनिवार दि.२६ एप्रिल २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## मंगळावर मानवी वसाहत स्थापन करण्याची महत्त्वाकांक्षी योजना

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि त्यांचे सहकारी बुच विल्मोर आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक वरून सुरक्षित परतले आहेत. खरं तर, जेव्हा जगातील सर्वात शक्तिशाली अमेरिकन अंतराळ संस्था नासा (नॅशनल एरोनॉटिक्स अँड स्पेस ॲडमिनिस्ट्रेशन) या दोन अंतराळवीरांना पृथ्वीवर आणण्यात अयशस्वी ठरली, तेव्हा त्यांना खाजगी अंतराळ संस्था स्पेसएक्सची मदत घ्यावी लागली. स्पेसएक्स आणि नासा यांच्यात जुनी स्पर्धा आहे ही वेगळी बाब आहे. स्पेसएक्सचे मालक, जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे वरिष्ठ सल्लागार एलोन मस्क यांनी तेवीस वर्षांपूर्वी १४ मार्च २००२ रोजी या खाजगी अंतराळ संस्थेची स्थापना केली.

स्पेसएक्सला पहिले तीन रॉकेट प्रक्षेपित करण्यात अपयश आले. त्याने त्याची आर्थिक व्यवहार कंपनी १७५ दशलक्ष डॉलर्सना विकली, त्यापैकी १०० दशलक्ष डॉलर्स त्याने मध्ये गुंतवले. २००४ मध्ये, एलोन मस्क आणि त्यांच्या समर्थकांनी नासाचा एकमेव कंत्राट स्पेसएक्सऐवजी किस्टलर एरोस्पेसला दिल्याच्या निषेधार्थ सरकारी अकाउंटेबिलिटी ऑफिससमोर नासाच्या विरोधात निदर्शने केली. तथापि, मस्क आणि त्यांची कंपनी अंतराळाच्या जगात पुढे जात राहिली, परंतु स्पेसएक्सचा अंतराळातील प्रवास इतका सोपा नव्हता. स्पेसएक्सचे पहिले तीन रॉकेट प्रक्षेपण अयशस्वी झाले. यामुळे केवळ स्पेसएक्सच नाही तर मस्कच्या टेस्लासह इतर कंपन्या दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर आल्या. मस्क नक्कीच निराश झाला, पण त्याने हार मानली नाही. २००८ च्या सुरुवातीला मस्क नासाकडून निधी मिळवण्यात जवळजवळ अपयशी ठरला, परंतु त्याच वर्षाच्या अखेरीस त्याला १.६ अब्ज डॉलर्सचा निधी मिळवण्यात यश आले. यानंतर, स्पेसएक्सने असे उड्डाण केले जे सतत सुरू आहे.

मंगळावर मानवी वसाहत करणे, म्हणजे लाल ग्रहावर कायमस्वरूपी मानवी वस्ती निर्माण करणे, एक महत्त्वाकांक्षी आणि आव्हानात्मक योजना आहे. या योजनेत, मंगळावर मानवी निवासस्थाने, अन्न उत्पादन, पाणी व्यवस्थापन आणि ऊर्जा निर्मिती यांसारख्या सोयी-सुविधा निर्माण करणे समाविष्ट आहे. मंगळावर मानवी वसाहत स्थापन करण्याची योजना, २०३३ वर लक्ष

मर्यादित संसाधनांसह आपले काम सुरू करणाऱ्या स्पेसएक्सकडे सध्या सुमारे १२,००० लोकांचे कर्मचारी आहेत आणि त्यांनी २४० फाल्कन रॉकेट देखील प्रक्षेपित केले आहेत. २०२२ मध्ये मानकांकडे दुर्लक्ष केल्याबद्दल स्पेसएक्सला १८,४७५ डॉलर्सचा दंडही ठोठावण्यात आला होता, तर मस्कने माजी राष्ट्राध्यक्ष बायडेन यांच्या प्रशासनावर राजकीय कारणांसाठी सुनीता आणि बुच यांच्या परत येण्यात अडथळा आणल्याचा आरोपही केला होता. आता मस्कने स्पेसएक्स क्रू १० ड्रॅगन कॅप्सूलमध्ये सुनीता आणि बुच यांना पृथ्वीवर आणण्याचा आणि मंगळावर मानवी वसाहत स्थापन करण्याची त्यांची महत्त्वाकांक्षी योजना अंमलात आणण्याचा आपला हेतू व्यक्त केला आहे. त्यांनी २०१७ मध्ये घोषणा केली की ते २०२४ मध्ये लाल ग्रहावर (मंगळावर) मानव पाठवतील. तथापि, आता ते २०३३ पर्यंत होण्याची अपेक्षा आहे.

मस्कला स्वतः मंगळावर जायचे आहे ५० वर्षीय एलोन मस्क यांनी अनेक वेळा सांगितले आहे की त्यांना स्वतःला आयुष्यात एकदा तरी मंगळावर जायचे आहे. गेल्या वर्षीच, त्यांच्या कंपनीने नासाच्या शास्त्रज्ञांना आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात पाठवण्याचे आणि त्यांच्या अंतराळयान आणि प्रक्षेपण वाहनांचा वापर करून त्यांना परत आणण्याचे काम सुरू केले.

मंगळावर मानवी वसाहत करणे ही एक मोठी आणि गुंतागुंतीची प्रक्रिया आहे, परंतु भविष्यात मानवाने मंगळावर वसाहत स्थापन केली, तर ते मानवाच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरू शकते.अनेक वेळा मंगळावर पाणी असल्याचे पुरावे मिळाले आहेत.

पृथ्वीच्या तुलनेत मंगळाच्या एका दिवसात ३७ मिनिटे अतिरिक्त असतात आणि एक वर्ष पृथ्वीवरील ६८७ दिवसांचे असते. तेथील वातावरण पृथ्वीच्या तुलनेत पातळ आहे आणि त्याचा सर्वात मोठा हिस्सा कार्बन डाय ऑक्साइडने व्यापलेला आहे. त्या वातावरणात केवळ ०.१३ टक्के ऑक्सिजन आहे.

पृथ्वीच्या तुलनेत मंगळावर गुरुत्वाकर्षण बल खूपच कमी आहे. तथापि, त्यानंतरही सूर्यमालेतील इतर ग्रहांपेक्षा ते पृथ्वीशी मिळतेजुळते आहे. त्याच कारणामुळे या ग्रहावर जीवसृष्टीचा वारंवार शोध घेतला जात आहे. आता मंगळावर पृथ्वीसारखा महासागर आहे का, तेथे कोणत्याही स्वरूपात जीवनसृष्टी अस्तित्वात आहे का आणि या लाल ग्रहावर माणूस कायमस्वरूपी राहू शकेल का, या प्रश्नांची उत्तरे अजून शास्त्रज्ञांना मिळालेली नाहीत.

# नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणात ऐआय तंत्रज्ञान महत्वाची भूमिका घेणार – माजी कुलगुरू डॉ. विजयकुमार धारूरकर

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे** – भारतात नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणात ऐआय हे अत्याधुनिक तंत्रज्ञान महत्वाची भूमिका घेणार आहे. तसेच कौशल्य विकास आधारित शिक्षण प्रणालीमुळे नवीन शैक्षणिक धोरण जागतिक स्तरावर महत्त्वाचे ठरणार आहे. भारतीय नवीन शिक्षण धोरणाचे हे वेगळेपण असल्याने जगातील अनेक देशात भारतीयांना मोठा वाव आहे असे प्रतिपादन त्रिपुरा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. विजयकुमार धारूरकर यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शिक्षण शास्त्र आणि विस्तार विभाग आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ नॉलेज तसेच इंडिपेंडन्ट स्कुल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि ऐ आय तंत्रज्ञानाचे महत्व या विषयावर एक दिवशीय चर्चासत्र गुरुवार दि.२४ रोजी आयोजित करण्यात आले होते, यावेळी डॉ. धारुरकर बोलत होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शिक्षण शास्त्र आणि विस्तार विभागाच्या सभागृहात हे चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.

विभाग प्रमुख डॉ. गीता शिंदे, दिव्यांग अभ्यास व सर्व समावेशक शिक्षण केंद्र समन्वयक डॉ.धनंजय भोळे, स्कुल असोसिएशनच्या अध्यक्ष जागृती धर्माधिकारी, अक्षरा इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्य डॉ. मृदुला महाजन, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ नॉलेजचे संस्थापक अध्यक्ष निलेश छडवेलकर मोलाचे मार्गदर्शन केले. डॉ.



विजयकुमार धारूरकर यांनी लिखित राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० या विषयावरील ग्रंथाचे विमोचन डॉक्टर गीता शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. आयआयकेचे कार्यकारी संचालक संजयकुमार जोशी, सहसंस्थापक व संचालक सचिन नालापुरे तसेच राज्यातील विविध शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, सचिव, प्राचार्य, उप प्राचार्य, प्राध्यापक, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षण तज्ज्ञ, विद्यार्थी, माध्यम तज्ज्ञ, संपादक, पत्रकार, विद्यार्थी आणि शिक्षण शास्त्र विभागाच्या अधिकारी कर्मचारी यांनी सहभाग नोंदवला.

अक्षरा इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्य डॉ. मृदुला महाजन यांनीही या चर्चासत्रात नवीन शैक्षणिक धोरणामुळे शिक्षण क्षेत्रातील प्राध्यापक, शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांना होणारी उपयोगिता स्पष्ट केली. तर जागृती धर्माधिकारी यांनी नवीन शिक्षण धोरणात शिक्षक, प्राध्यापक यांच्या माध्यमातून देशस्तरावर होणाऱ्या विविध प्रवाहाची माहिती दिली. डॉ.धनंजय भोळे यांनी दिव्यांग विद्यार्थी आणि नवीन शैक्षणिक धोरण याच्या बाबतीत भूमिका मांडली. निलेश छडवेलकर यांनी आयआयकेच्या शिक्षण क्षेत्रातील विविध उपयुक्त अशा प्रकारच्या कार्याची विस्तृत माहिती दिली. नवीन शिक्षण धोरणात ऐ आय चे महत्त्व लक्षात घेऊन आयआयकेच्या वतीने ग्रोविंग डॉट्स परखं या नाविन्यपूर्ण अशा ऑनलाईन सॉफ्टवेअर ॲप्लिकेशनची ओळख व विद्यार्थी-पालक-शिक्षक आणि शिक्षण संस्थेच्या व्यवस्थापनास असेसमेंट, अध्यापन निष्पती, रिपोर्ट्स कसे उपयोगी पडतात याबद्दल प्रेझेंटेशन दिले. गेल्या २१ वर्षात आयआयकेच्या बहुउपयोगी उपक्रमात सहभागी होऊन भारतातील मराठी भाषेतील पहिल्या डिजीटल ज्ञानगंगा या इनसायक्लोपीडिया, ऑनलाइन सायन्स एक्झिबिशन आता आंतरराष्ट्रीय स्तरावर करण्यात येत आयोजित करण्यात येणार असल्या याबद्दलची विस्तृत अशी माहिती दिली.

या कार्यशाळेमध्ये शिक्षक, शाळांचे प्रमुख व संस्थाचालक एकत्र आले आणि नवी राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी) २०२० च्या चौकटीत कृत्रिम बुद्धिमत्तेच्या परिवर्तनकारी क्षमतेवर सखोल विचारमंथन करण्यात आले.

या कार्यशाळेचे अध्यक्षस्थान डॉ. विजयकुमार धारुरकर यांनी भूषविले. त्यांनी एनईपी २०२० वर त्यांचे सखोल ज्ञान आणि विचारसरणीमुळे चर्चांना अत्यंत मोलाची दिशा व संदर्भ मिळाले.

**पुढील सत्रांमध्ये खालील विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली:**

दिव्यांगता आणि समावेशक शिक्षण – श्री. धनंजय भोळे यांनी 'दिव्यांगता आणि समावेशक शिक्षण' या विषयावर सत्र घेतले, ज्यामध्ये शिक्षण क्षेत्रातील समावेशकतेच्या महत्त्वावर भर देण्यात आला.

एनईपी २०२० ची मूल्यमापन सुधारणा व पेडालॉजिकल ट्रान्सफॉर्मेशन -: डॉ. मृदुला महाजन, प्राचार्या अक्षरा इंटरनॅशनल स्कूल यांनी एनईपी २०२० मध्ये सुचवलेली मूल्यमापनातील सुधारणा व अध्यापन प्रक्रियेतील परिवर्तन यावर मार्गदर्शन केले.

मूल्यमापनातील नवकल्पना परख -: श्री. निलेश छडावेलकर, अध्यक्ष इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ नॉलेज यांनी '' परख'' या अभिनव मूल्यमापन पद्धतीवर माहितीपूर्ण सत्र घेतले. या तज्ज्ञांचे सादरीकरण उपस्थित शिक्षक, शाळा व संस्थाचालकांसाठी अत्यंत लाभदायक ठरले. या चर्चांमुळे एनईपी २०२० च्या परिणामांचा आणि च्या साहाय्याने मूल्यमापन आणि अध्यापन प्रक्रियेतील क्रांतिकारी बदलांचा सखोल अभ्यास करता आला. ''एआय इन एज्युकेशन: एनईपी २०२० च्या मूल्यमापन सुधारणा आणि पेडालॉजिकल ट्रान्सफॉर्मेशन'' ही कार्यशाळा ज्ञानवृद्धी आणि सखोल चर्चा यांचे एक मौल्यवान व्यासपीठ ठरली.

## एन -७ सिडको शाळेतील विद्यार्थ्यांचे ऑलिम्पियाड परीक्षेत दैदीप्यमान यश

**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** – महानगरपालिका सीबीएसई पॅटर्न शाळा एन सेवन सिडको छत्रपती संभाजीनगर शाळेतील विद्यार्थ्यांनी मॅथेमॅटिक्स आणि सायन्स ओलंपियाड परीक्षेत घवघवीत यश प्राप्त केले.

इयत्ता पहिलीमध्ये मॅथेमॅटिक्स ओलंपियाड परीक्षेत नमन जौक, समृद्धी टोणपे, धीरज भोसले या विद्यार्थ्यांनी सुवर्णपदक प्राप्त केले. इयत्ता दुसरीत मॅथेमॅटिक्स ओलंपियाड परीक्षेत नील ठोकळ, मुक्ता कुलकर्णी, अक्षदा वाणी, सादिया शेख व सायन्स ओलंपियाड परीक्षेत सादिया शेख, निल ठोकळ, विवान घोरपडे या विद्यार्थ्यांना सुवर्णपदक प्राप्त झाले.शाळेचे मुख्याध्यापक शेख अहमद पटेल यांच्या मार्गदर्शनानुसार फिरदोस नदाफ, सबासदफ सिद्दिकी, पल्लवी क्षीरसागर, श्रीमती अमृता




लोहार या शिक्षिकांनी विद्यार्थ्यांचा सदरील परीक्षेसंदर्भातील पाठ्यक्रमाचा चांगल्या रीतीने सराव करून घेतला. मनोज अग्रवाल यांनी मॅथेमॅटिक्स व सायन्स ओलंपियाड परीक्षेचे आवेदन पत्र भरून जमा करणे, संदर्भग्रंथ आणून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे या कार्यात महत्वपूर्ण कामगिरी बजावली.

सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. सदरील कार्यक्रमात शेख अहमद पटेल, सुनंदा आरदवाड, मंगला महाजन, अंजली कुलकर्णी, स्वाती घोडतुरे, दिपाली औटे, वैशाली देशमुख, मंजुश्री राठोड, व्यंकट जाधव, शुभांगी चव्हाण, दीपक पडोळ, संपदा शिंदे, फिरदोस नदाफ, सबा सदफ सिद्दिकी, पल्लवी क्षीरसागर, अमृता लोहार, पुष्पा दाभाडे, वंदना सुरडकर हे सर्व उपस्थित होते.

## प्रा. इम्रान बागवान यांना पीएचडी पदवी प्रदान

**ज्योतिर्मय साहित्य**



**छत्रपती संभाजीनगर** – येथील शिवछत्रपती महाविद्यालय, वाणिज्य विभागातील प्रा. इम्रान इस्माईल बागवान यांना डॉ. बाबासाहेब अंबेडकर मराठवाडा विद्यापीठाकडून नुकतीच वाणिज्य विषयातून पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली.त्यांनी ''रिलीजिओसिटी अमंग मुस्लिम कंसुमर्स एंड इट्स इम्पैक्ट ऑन कंसुमर बाइंग बेहवीयर टुवर्ड्स फूड प्रोडक्ट्स इन महाराष्ट्र'' या विषयावर संशोधन कार्य केले आहे. मार्गदर्शक म्हणून डॉ माणिक वाघमारे आसारामजी भांड़वालदार कॉलेज, देवगांव रंगारी यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच डॉ नवनाथ आघाव, संशोधन केन्द्रप्रमुख, डॉ सय्यद अज़हरुद्दीन, डॉ. गणेश काथार, डॉ. विलास दापके, डॉ. अविनाश धोत्रे यांचे विशेष सहकार्य लाभले. या बद्दल शिवछत्रपती महाविद्यालय विकास समिति सदस्य मा. प्रदीप भाऊ चव्हाण, प्राचार्य डॉ राजेन्द्र पवार आणि उपप्राचार्य भरत वहाटूळे, डॉ. संगीता राजमाने पर्यवेक्षक डॉ अश्रुबा गवळी, राहुल पाटील विभागप्रमुख नितिन गायकवाड़ सर्व सहकारी यानी अभिनंदन केले. तसेच वडील इस्माइल बागवान, ज्येष्ठ बंधु सादिक बागवान (उपसरपंच हरतखेड़ा) व मामा सत्तार सेठ बागवान (माजी सरपंच आव्हाना) व सर्व मित्रपरिवार बागवान कुटुंबाने कौतुक केले. प्राध्यापक इम्रान शेख हे मुळ हरतखेड़ा तालुका अंबड़, जिल्हा जालना येथील रहिवासी आहेत, पीएचडी प्रदान करणारे ते गावातील प्रथम व्यक्ति आहेत करिता त्यांचे कौतुक हे ग्रामस्थांसह मित्रपरिवारातून होत आहे.

# २६ नोव्हेंबर चित्रपट म्हणजे दीक्षाभूमीला वाहिलेले फूल

**अभिनेते सयाजी शिंदे यांचे भावोद्गार, चित्रपटाचे ७५ टक्के शूटिंग नागपुरात**

**ज्योतिर्मय साहित्य**

**नागपूर** – २६ नोव्हेंबर हा चित्रपट म्हणजे दीक्षाभूमीला वाहिलेले आदराचे फूल आहे, असे भावोद्वार प्रसिद्ध अभिनेते सयाजी शिंदे यांनी येथे काढले. २६ नोव्हेंबर या चित्रपटानिमित्त आयोजित पत्रपरिषदेत ते बोलत होते. चित्रपटाचे ७५ टक्के शूटिंग नागपूर परिसरात झाले असून महत्वाचा भाग ससेगाव झोपडपट्टीत चित्रित केला आहे.अनिलकुमार जवादे आणि निलेश ओंकार निर्मित २६ नोव्हेंबर हा संविधानावर आधारित चित्रपट ९ मे रोजी रिलीज होत आहे. या चित्रपटात हसत, खेळत, रंजक पद्धतीने संविधानाची मूळ भावना मांडण्यात आली आहे.

आजही समाजमन बऱ्यापैकी गढूळ आहे, महापुरुषांवरून वाद घडत आहे पण महनीय व्यक्तींना जातीधर्मात बांधू नये, त्यांचे विचार अंगीकारावे, असे सचिन उराडे म्हणाले. चित्रपटाचे ७५ टक्के शूटिंग नागपूर परिसरात झाले असून, म्हत्वाचा भाग ससेगाव झोपडपट्टीत चित्रित केला. जम्बुद्विप प्रोडक्शनचा हा पहिला चित्रपट नागपूर भूमितलाही पहिला मोठा चित्रपट आहे, असे निलेश ओंकार म्हणाले. १५ ऑगस्ट, २६ जानेवारीप्रमाणे २६ नोव्हेंबर हा संविधान दिवस साजरा करण्याची भावना रुजावी हा या चित्रपटनिर्मिती मागचा उद्देश असल्याचे जवादे यांनी स्पष्ट केले. विचारप्रवृत्त करणारा चित्रपट, असे वर्णन विजय पाटकर यांनी केले. ही माझ्या जीवनातील माईलस्टोन, समाजाचे प्रतिनिधित्व करणारी ताकदवर भूमिका आहे, असे अनिकेत विश्वासराव म्हणाले.

नवोदित अभिनेत्री जुई यांनीही चित्रपट प्रवासाची कथा उलगडली. डॉ. विलास उजवणे यांचा हा अखेरचा चित्रपट होय. प्रभाकर आंबोणे, वत्सला आंबोणे यांच्यासह नागपूरचे बरेच कलाकार या चित्रपटात आहे. यावेळी चित्रपटातील मुख्य कलाकार अनिकेत विश्वासराव, विजय पाटकर, डॉ. जुई जवादे, निर्देशक सचिन उराडे, निर्माते अनिलकुमार जवादे आणि डॉ. अंजली उजवणे उपस्थित होते.





– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com



**आनंदी पहाट...**

## थेंबे थेंबे तळे साचे

ज्योतिर्मय साहित्य

थेंबे-थेंबे तळे साचे या उक्तीप्रमाणे एक एक रुपयांच्या बचतीतून त्यांच्याच भावी आयुष्यासाठी लाखो रुपयांची बचत होऊ शकते. अनेक प्रकारच्या बिलांची रक्कम आगाऊ भरल्यास अथवा इंटरनेटद्वारे भरल्यास मिळणारी सूट एकप्रकारे काही प्रमाणात आपली बचतच करत असते. प्रत्येक महिन्याची हि एकूण रक्कम अगदी शंभर रुपये असली तरीही वर्षभराची याद्वारे होणाऱ्या आपल्या बचतीची रक्कम एक हजार दोनशेहून अधिक असणार आहे. आपल्या पैशाच्या गुंतवणुकीला भावनांची जोड असते. आपल्या भाव-भावना, आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षण, चांगले-वाईट अनुभव या सर्वच गोष्टींचा संबंध आपल्या पैशाच्या गुंतवणुकीशी असतो. त्यामुळे आपण करत असलेली "गुंतवणूक भावनांची असते आणि आनंद कोट्यावधींचा असायला लागतो". या आनंदाची अनुभूती अनुभवण्यासाठी निश्चितच काही विशेष खबरदारी घ्यावी लागते. काहीवेळा आपल्या गुंतवणुकीचा विषय भावनेचा असल्यामुळे आपण निर्णय देखील भावनेच्या आहारी जाऊन घेतो. आणि तो भावूकतेत घेतलेला निर्णय आपल्या भवितव्यावरच घाला घालतो. आपलं भवितव्य उज्वल होण्याच्या ऐवजी उध्वस्त होण्याची शक्यता निर्माण होते. हल्ली अनेक प्रकारची प्रलोभने दाखवून आणि फसव्या जाहिराती करून तसेच मोठ्ठ्या परताव्याची आमिषे दाखवून इंटरनेट, मोबाईल, सोशल नेटवर्किंग या विविध माध्यमांच्या वापरातून अनेकांच्या फसवणुकीच्या घटना घडत असल्याचं आपण नेहेमीच ऐकत आहोत. या अशा प्रकारच्या फसवणुकीचा फटका आपल्याला बसणार नाही यासाठी आपण सदैव सतर्क राहणं आवश्यक आहे. आपल्या पैशाची गुंतवणूक करताना अविचारांना दिला थारा कि समजा तुमच्या लाखाचे झाले बारा. आपली सजगता, सतर्कता, समय सूचकता आणि सावधानता याच गोष्टी आपल्या सुखी, समृद्धी आणि सदा-सुखी जीवनासाठी महत्वाच्या ठरणार आहेत. त्यासाठीच "गुंतवणूक भावनांची असली तरीहि आनंद कोट्यावधींचा असायला हवा".

## अनोखे अंदमान




ज्योतिर्मय साहित्य

त्या एकट्याच उरल्या. रॉस बेटावरील प्राण्यांची शिकाऱ्यांकडून अवैध शिकार होऊ लागली आणि येथील प्राणी नष्ट होऊ लागले. त्याचे गांभीर्य अनुराधा यांना लक्षात आले आणि त्यांनी या प्राण्यांना आपले अपत्यवत प्रेम दिले. आज त्यांच्यामुळेच येथील प्राणीसृष्टी जिवंत आहे. येथील प्रत्येक हरणाला त्यांनी नाव दिले आहे. ती हरणे सुद्धा त्यांना ओळखतात. त्यांनी बोलावले की त्यांच्या जवळ येतात, त्यांचे म्हणणे ऐकतात. आपले पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी यांनी सुद्धा मन की बातच्या एका कार्यक्रमात वन्यजीवांच्या संरक्षणार्थ त्यांनी केलेल्या कामाचा गौरव पूर्ण उल्लेख केला होता.

त्या कोणाकडूनही पैसे मागत नाहीत. पण येथे येणारे पर्यटकच त्यांना स्वतःहून मदत करतात. स्वातंत्र्यवीर सावरकरांबद्दल अनुराधाताईच्या मनात अपार आदर आहे. परंतु दुर्दैवाने माझी त्यांची भेट होऊ शकली नाही.




रॉस बेटावरील ही मनमोहक सफर संपवून दुपारी आम्ही नॉर्थ बे या ठिकाणी आलो. हे ठिकाण तर अतिशय सुंदर आहे. आमचा संपूर्ण दिवस जणू निळ्या हिरव्या रंगाच्या स्वप्नात रंगला होता असे म्हणावे लागेल.

नॉर्थ बेच्या किनाऱ्यावर पाऊल टाकताच एका वेगळ्याच आनंदाच्या लहरी आपल्याला व्यापतात. पायांखालची शुभ्र वाळू, समोर फेसाळणाऱ्या लाटा, आणि आजूबाजूच्या झाडांवरून ऐकू येणारा सारस पक्ष्यांचा किलबिलाट जणू एक निसर्गसंगीत सुरू झालंय असं वाटतं.

इथेच ठरल्याप्रमाणे आमच्यातील पर्यटकांनी वॉटर स्पोर्ट्स चा आनंद लुटला. आमच्यातील जे वयाने तरुण होते त्यांनी साहसी वॉटर स्पोर्ट्सचा आनंद आणि थरार अनुभवला. आम्ही एका सेमी सबमरीनमध्ये बसून समुद्र तळाचे अद्भुत दृश्य पाहिले. जणू पाण्याखालील रंगपंचमीच आम्ही अनुभवात होतो. एक वेगळेच विश्व आमच्या डोळ्यासमोर होते. बोटीच्या काचेतून दिसू लागलं एक इंद्रधनुष्य. कोरल्सच्या विविध आकृती मेंदूच्या रेघांप्रमाणे, फुलांचं गालिचा वाटावा अशा रंगांमध्ये, विविध रंगी देखण्या माशांचे सुंदर थवेच्या थवे आमच्या समोरून पोहत जात होते हे सगळं एखाद्या कल्पनारम्य चित्रासारखं वाटत होतं.

**(क्रमशः)**



**दासबोध स्तवन**



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## स्वगुण परीक्षा (ब)

ज्योतिर्मय साहित्य

अधर्माने वागुन स्वतःच्या आयुष्याचे वाटोळे करून घेऊ नका. संयत धीर धर्मरक्षण,स्वकुळाचा ऊद्धार,

अतिलोभापायी वारेमाप धनसंपत्ती गोळा करणे सत्कर्म न करणे दानधर्म नकरणे, आहे त्या धनद्रव्याचा वापर योग्य प्रकारे न करता धनसंपदा साठवून ठेवणे. अशा अवस्थेत घरावर दरोडा पडला तर सगळं धनसंपदा चोर चोरून नेतात व हा कफल्लक होतो.

अशा रितीने वाईट मार्गाने मिळवलेला पैसा संपून जातो व हा माणूस रोगाचे भांण्डार बनतो. संपूर्ण शरीरात रोग पसरतो. केलेल्या पापाची फळे भोगण्याची वेळ येते.तारूण्यातील ऊन्माद संपतो शरीरभर किडे पडतात. कळाहीन देह,हातपाय झडलेले, शरीरात कंप भरलेला.अक्षरशः त्याच्या आसपास पण माणसे थांबत नाहीत सगळा किळसवाणा प्रकार पाहून याची अवस्था ना इहलोकी ना परलोकी अशी झाली. वाईट कर्माचे फळ असे मिळते.पुढच्या ओव्या मध्ये (२२ ते ४६) या ओव्या मध्ये रोगातून बरे होणे मुल होण्यासाठी नवस

सायास करणे थोडक्यात अंधश्रद्धा मनामध्ये ठेऊन करणी, गोसावी, बैरागी, चेटकाचे प्रयोगहीन मंत्रप्रयोग

करणे असे समाज विघातक कर्म त्याच्या कडून होते.

संपूर्ण समासाचा सार विचारात घेता अधर्माने वागू नका नितीधर्माचे पालन करा भगवंताशी एकरुप व्हायला विसरू नका. असेच समर्थ सांगतात.

सद्गुणांचा अवलंब करून देहाचे सोने करावे. भगवंताची ऊपासना करावी. हे या निमित्ताने सांगणे.

श्री राम जय राम जय जय राम।।

## सदवस्तू साध्य करून घेण्याचा उपाय सत्संगती.



**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

ज्योतिर्मय साहित्य

एखाद्या दारूबाजाप्रमाणे विषयी मनुष्य वागत असतो. त्याला सर्व कळते, पण वळत नाही. एकीकडे स्वत:ला जो परमात्म्याचा अंश म्हणवितो, आणि दुसरीकडे विषयांच्या आहारी जातो. खरोखर, भक्तीशिवाय सर्व काही वाया आहे. संताजवळ राहावे आणि भक्तीचे साधन करावे. आपल्याला काही करायचे उरले आहे असे जे वाटते, ते न वाटू लागले, म्हणजे साधनात प्रगती झाली असे समजावे. भगवंताची भक्ती घडायला गुरुसेवा हे एक मुख्य साधन आहे. जो शिष्य आज्ञा पाळतो त्याला भेटणे गुरूला भागच पडते. वास्तविक, गुरू मनात काही इच्छाच येऊ देत नाही; म्हणून कामधेनूपेक्षाही गुरू श्रेष्ठ आहे.

अत्यंत तळमळीशिवाय भगवंताचा योग शक्य नाही. संतसमागम प्रारब्धाने होतो, पण 'सम' रीतीने जाता आले तर खरा 'समागम' घडतो. पण आमचा मार्ग विषय आहे; म्हणून संत भेटूनही त्याचा 'समागम' आपल्याला होत नाही. विषयांमध्ये धुंद असलेल्या आम्हांला पाहून संतांच्या मनात कालवाकालव होते; त्याची आपल्याला कल्पनाही येणार नाही. आपली बुद्धी आपल्याला समाधानाप्रत नेत नाही, तर दुसऱ्याची मदत घेणे आवश्यक आहे. अशा वेळी, ज्यांची मदत आपण घेतो त्यांचे आपण ऐकायला नको का ? भगवंताच्या जिज्ञासेचा मार्ग आक्रमायला संतांनी सांगितले. संतांना जिज्ञासा मूळचीच असते. आपल्याला ती नाही, म्हणून ती उत्पन्न करणे भाग आहे. काही केल्याशिवायच सद्वस्तू साध्य करून घेण्याचा उपाय, म्हणजे सत्संगती हा होय. सत्संगती अती अपूर्व काम करणारी आहे. ज्याचे भाग्य थोर असेल त्यालाच ती लाभेल. एखादा मनुष्य भोवऱ्यात सापडला तर त्याला बाहेर काढण्याचे दोन मार्ग आहेत. एक मार्ग असा की, दुसऱ्या चांगल्या पोहणाऱ्याने त्या भोवऱ्यामध्ये उडी मारून तो फोडायचा आणि बुडत्याला बाहेर ओढून काढायचे. पण यासाठी शक्ती फार लागते. दुसरा मार्ग असा की, आपणच भोवऱ्यामध्ये बुडी मारून तळाशी जायचे आणि खालून बाहेर निघायचे. विद्वत्ता ही भोवऱ्यासारखी आहे. वर वर पाणी फिरत असते तरी तळाशी ते संथ असते. तसे, जे लोक वरवर विद्या शिकतात ते वादाच्या आणि मतांतराच्या चक्रात सापडतात; पण जे खोल तळाशी जातात त्यांना खरे काय ते आपोआप कळते, आणि ते सगळीकडे एकच असते. विद्येच्या भोवऱ्यामध्ये सापडणाऱ्यांना बाहेर ओढून काढण्याचे काम फार मोठ्या संतांचे असते. शहाण्याने त्या भानगडीत न पडावे. हजारो लोक भगवंताच्या नामाला लावणे हे खरे संतांचे काम होय.कोणत्याही सत्पुरुषाची परंपरा रक्षण केली पाहिजे. त्यात आपले घुसडू नये.



**॥ संत - महात्म्य ॥**

**संकलन : मधुकर बोरीकर**
**9403061886 (स्त्रोत:- इंटरनेट)**

## संत श्रेष्ठ श्री तुलसीदासजी

ज्योतिर्मय साहित्य



साहित्यिक दृष्टीने जरी विचार केला तरी तुलसीदासजींच्या रचनेमध्ये कोणताही दोष काढणे हे सोपे काम नाही. श्री राम चरित्र मानस याची प्रसिद्धी संपूर्ण जगतात वाढायला लागली हे पाहून काशीच्या पंडितांना मनात इर्षा उत्पन्न झाली. ते जमेल तेवढा त्यास विरोध आणि निंदा करण्याच्या प्रयत्नाला लागले. एकदा त्यांनी दोन विख्यात चोरांना रामचरीत मानस हा लिखित ग्रंथ चोरून आणण्यास सांगितले. जेव्हा हे चोर तुळशीदासजीच्या झोपडीत घुसण्यासाठी प्रयत्न करत होते, तेव्हा त्यांनी हे पाहिले की बाहेर दोन शूर युवक योद्धे हे झोपडीच्या रक्षणासाठी धनुष्य बाण घेऊन सज्ज आहेत. ते दिसायलाही सुंदर, मोहक होते. एक शाम वर्णाचा तर एक गौरवर्णाचा होता. या दोन युवकांना पाहून चोरांची बुद्धी शुद्ध झाली. त्यांच्या मनातील चोरी करण्याची वासना तात्काळ गळून पडली. आणि ते सरळ जाऊन तुळशीदासजींच्या चरणावर वीनम्र झाले. तुळशीदास यांना जेव्हा ही कळाले की आपल्यासाठी भगवंत रात्री पहारा देत आहेत तेव्हा त्यांना अपराधीपणाची जाणीव झाली.आपल्या झोपडीतील या वस्तूंचा मोह आपणास नडतो आहे.त्यासाठी प्रभुस आपल्या वस्तू राखण्यास साठी बाहेर पहारा द्यावा लागावा ही किती शरमेची गोष्ट आहे.सेवकाने स्वामीची सेवा करावी तर इथे आपल्या मोहापोटी हे उलटेच घडले.मी किती मोठा पापी आहे असे विचार त्यांच्या मनी येऊ लागले. त्यांनी आपली घरातील सर्व संपत्ती दान देऊन टाकली आणि तोडरमल नावाच्या मित्रास राम चरित मानस हे पुस्तक त्यांनी सांभाळण्यासाठी दिले. हा तोडर्मल अकबर बादशहाच्या पदरी नवरत्न पैकी एक होता.

तुलसीदास यांनी हा ग्रंथ त्याच्याकडे सुपूर्त केला तरी, त्यांची प्रतिभा आणि विलक्षण स्मरणशक्तीच्या जोरावर संपूर्ण ग्रंथ अगदी तसाच त्यांनी पुन्हा लिहून काढला आणि नंतर त्याच्या अनेक प्रति सुद्धा तयार केल्या. तुलसीदासजी काशीच्या तुलसी घाटावर रहात. त्यांच्या कडून राम कथा ऐकण्यासाठी अलोट गर्दी जमा होई. एके दिवशी कलियुग, मनुष्य रूप धारण करून तुलसीदासजी यांच्याकडे आले व त्यांना त्रास देण्यास सुरुवात केली. त्याच क्षणी तुलसीदास यांनी हनुमंतरायाचे ध्यान केले.तत्क्षणी हनुमंत राय साक्षात प्रकट झाले. त्यांनी कलियुगापासून होणारी पीडा लगेच नष्ट केली. आणि त्यांनी सांगितले की तुम्ही प्रार्थना पर पद्यरचना करा. यानंतर तुळशीदासजीने त्यांची अंतिम कृती विनय पत्रिका ही लिहिली. आणि ही विनय पत्रिका त्यांनी भगवान श्रीरामांच्या चरणावर समर्पित केली. प्रभू श्रीरामांनी त्यावर स्वतःचे हस्ताक्षर करून तुलसीदास यांना त्यांच्या स्विकृतीची जणू पुष्टी केली.

त्यांनी आपणा सर्वांना एक प्रयोग दिला "सिया राम सरूप सब जग जानी करहू प्रणाम जुग जोड पानी

या जगतातील सर्व स्त्री शक्तीला माता सीता व सर्व पुरुषांना प्रभू श्री राम समजून विनम्र भावाने हात जोडून नमस्कार करा.

प्रेम आटलेल्या जा जगात प्रेम वृद्धीसाठी वरील प्रयोग सतत गिरवायला हवा. हा प्रयोग या संत श्रेष्ठी निश्चितच काटेकोरपणे गिरवायला होता म्हणूनच तो आपणास तो दिला आहे.

संवत १६८० श्रावण शुक्ल सप्तमी या दिवशी राम राम असे म्हणत तुलसीदासजी यांनी आपला ११२ वर्षाचा प्रदीर्घ जीवन काल संपवीत या शरीराचा त्याग केलां

भगवत भक्तीचे मळे सर्वत्र फुलविणाऱ्या या महान संतास विनम्रतेने प्रणाम करून हा भाग इथे संपवूयात श्रीराम जय राम जय जय राम/ श्रीराम जय राम जय जय राम//

***



**नीतिशतक निरूपण**

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**भवन्ति नम्रास्तरवः फलोद्गमै**
**र्नवाम्बुभिर्दूरविलम्बिनो घनाः।**
**अनुद्धताः सत्पुरूषाः समृद्धिभिः**
**स्वभाव एवैष परोपकारिणाम।।**

अर्थ – फळे आली असता वृक्ष वाकतात. नवीन पाण्याने युक्त झाले असता, दूर लोंबकळणारे मेघही नम्र होतात. सज्जन समृद्धीच्या अवस्थेत विनम्र होतात. उन्मत्त होत नाहीत. परोपकारी लोकांचा हा स्वभावच असतो.

या श्लोकात वृक्ष आणि मेघ यांच्या उदाहरणांद्वारे सज्जनांच्या विनम्रतेचे महत्व सांगीतले आहे. सामान्य माणसे आवश्यकतेनुसार विनम्र किंवा अविनम्र होत असतात. सज्जन मात्र स्वभावानेच विनम्र असतात. समृद्धीच्या किंवा संपन्नतेच्या काळात त्यांची ही विनम्रता द्विगुणित होते. दुर्जनांचे आचरण हे "धनं मदाय।" म्हणजे धन प्राप्त झाले असता उन्मत्त होण्याचे असते. तर सज्जनांचे नेमके या ऊलट असते. ते उत्कर्षाच्या स्थितीत अधिक विनम्र होतात; असे कवीश्रेष्ठ भर्तृहरींनी या श्लोकात सांगीतले आहे.



**आरोग्य संजीवनी**

## शीतपित्त म्हणजे काय व अंगावर पित्त उठणे

ज्योतिर्मय साहित्य

शीतपित्ताचा त्रास अनेकजणांना असतो. यामध्ये अंगावर खाज सुटते व त्वचेवर पित्ताच्या लालसर गांधी व पुरळ उठतात. त्या पित्ताच्या गांधी काहीवेळाने कमी होतात. मात्र परत परत हा त्रास होत असतो. या त्रासाला शीतपित्त ह्या नावानेसुध्दा ओळखले जाते. ऍलर्जीमुळे अंगावर असे पित्त उठत असते. अंगावर पित्त का येते व अंगावर पित्त उठणे यावरील उपाय याची माहिती सांगितली आहे.

शीतपित्त म्हणजे काय?

अंगावर पित्त उठणे या समस्येला शीतपित्त असे म्हणतात. प्रामुख्याने थंड हवामानात जास्त प्रमाणात अंगाला पित्त उठत असल्याने या समस्येला शीतपित्त असे नाव दिलेले आहे. शीतपित्ताला आधुनिक वैद्यकीय भाषेत अर्टिकेरिया () किंवा असे म्हणतात तर बोलीभाषेत अंगावर पित्त उठणे असे म्हंटले जाते.

अंगावर पित्त उठण्याची कारणे

प्रामुख्याने ऍलर्जीमुळे अंगावर पित्त येते. ज्या पदार्थाची ऍलर्जी (वावडे) आहे, अशा पदार्थाच्या संपर्कात आल्यानंतर त्वचेतील विशिष्ट पेशींमधून हिस्टामाइन नावाचा पदार्थ स्त्रवतो. त्याचा परिणाम म्हणून त्वचेला खाज येते व त्वचेवर लालसर पित्ताच्या लहानलहान सुजयुक्त चकते उठतात.

कशामुळे अंगावर पित्त येते ?

कोणकोणत्या पदार्थांमुळे ऍलर्जी होऊन अंगावर पित्त उठू शकते याची माहिती खाली दिली आहे.

काही जणांना विशिष्ट पदार्थ खाल्यानंतर असा त्रास होऊ लागतो. यामध्ये अंडी, शेंगदाणा, काजू, मासे, शेलफिश, मांसाहार, स्ट्रॉबेरी, गहू, हरभरा डाळ, तूर डाळ वैगेरे खाद्यपदार्थ यापैकी कशाचीही ऍलर्जी असू शकते. असा पदार्थ खाण्यात आल्यास त्यांच्या अंगावर पित्त उठते.विशिष्ट औषधे घेत असल्यासही असा त्रास होऊ शकतो. यामध्ये अँटीबायोटिक्स किंवा वेदनाशामक औषधे यांची ऍलर्जी असू शकते. घरातील कुत्री, मांजरी, घोडे इत्यादी पाळीव प्राण्यांच्या केसांची ऍलर्जी असल्यास त्यामुळे अंगावर पित्त उठू शकते.

थंड वातावरण, थंड पदार्थ यामुळे अंगावर पित्त उठू शकते.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

सूर्यप्रकाश, उष्ण वातावरण, उष्ण पदार्थ यांची ऍलर्जी असल्यास त्यामुळेही अंगावर पित्त येते.

धूळ, धूर, हवेतील प्रदूषण, परागकण, केमिकल्स यांच्या संपर्कात आल्यामुळे, टेरेलीन, टेरीकाट अशा कपडांची ऍलर्जी असल्यास शितपित्त होऊ शकते.

तसेच पोटामध्ये कृमी व जंत झाल्याने, कीटक चावल्याने किंवा सर्दीसारखे इन्फेक्शन झाल्यामुळेही अंगावर पित्त उठू शकते. शीतपित्ताची लक्षणे -अंगावर खाज येणे, अंगावर पित्त उठणे, त्वचेवर सूज असणाऱ्या लालसर गांधी किंवा चकते उठणे अशी लक्षणे शीतपित्तामध्ये असतात.

या त्रासात आलेल्या पिताच्या गांधी व अंगाला होणारी खाज काहीवेळात आपोआप कमी होत असतात. मात्र पुन्हा ऍलर्जी असणाऱ्या पदार्थाच्या संपर्कात आल्यास पुन्हा अंगावर खाज सुटते व त्वचेवर पित्त उठते.

शीतपित्त किंवा अंगावर पित्त येणे हा त्रास एखाद्या पदार्थाच्या ऍलर्जीमुळे होत असतो. त्यामुळे नेमक्या ऍलर्जीचा ट्रिगर ओळखून त्यापासून दूर राहिल्यास हा त्रास दूर होत असतो. म्हणजे जर एखाद्यास शेंगदाणे खाल्ल्यानंतर असा त्रास होत असल्यास, त्याने शेंगदाणे खाणे बंद केल्यास हा त्रास होणे थांबते. यासाठी नेमकी कशाची ऍलर्जी आहे ते ओळखणे शीतपित्तामध्ये आवश्यक असते.

**(क्रमशः)**




ज्योतिर्मय साहित्य

कितीही द्रव्य दिले तरी ते त्यांनी घेतले नाही.घरात कथा करीत नाही म्हणाले. मग यज्ञ शाळेत कथा कराल काय?.ते होय म्हणाले.यज्ञ शाळेत राजाचे बाजूस सोन्याचा एक स्त्रीचा पुतळा ठेवला होता.त्या कडे पाहून लव म्हणाला, दादा हा पुतळा आपल्या आई सारखा दिसतो काय? कुशासही असेच वाटत होते. आता उद्याच्या भागात कुश लव रामायन गातील. या कथेतून आपले जीवनाला घडवणारे कांहीं गुण घेऊन आपणास आपले जीवन घडविता येते. चरित्र २ प्रकाराचे असतात. १ अनुभाव व २ लीला चरित्र. ज्या चरित्राचा श्रवणाने आनंद मिळतो ते लीला चरित्र असते. तर ज्या चरित्राचा अनुसरणाने आनंद मिळतो त्यास अनुभाव चरित्र म्हणतात. एखादे बालक, गंमत म्हणून जेव्हढ्या सहजतेने भूछत्र डोक्यावर धारण करते, तितक्याच सहजतेने भगवंतांनी गोवर्धन पर्वत धारण केला.ही लिला आहे. ती केवळ श्रवण करावी. अशी कृती जिचा परिणाम दिसतो, पण त्या कार्याचा कार्य कारण भावाची संगती लागत नाही, तो चमत्कार असतो. जड असणारी भिंत चालते याचे कारण कळत नाही. म्हणून ती चमत्कृती आहे. दोनच कारणानी माणसाला आश्चर्य वाटते. जिथे प्रेम आहे तिथे आश्चर्य आहे व जिथे कार्य कारण भावाची संगती लागत नाही तिथेही आश्चर्य असते. रांगणारे मूल चालायला लागणे यात आश्चर्य आहे, पण ते प्रेमामुळे. जिथे कार्य कारण भावाची संगती विचाराने लागत नाही अशा कृतीचे आचरण जर आपणा कडून घडले तर ते अधपताना कडे नेणारे असते.

**कथा ऐकता ऐकता धावते संकलन**
**मधुकर बोरीकर, 9403061886**

**(क्रमशः)**

## रवींद्रनाथ टागोर




विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

### रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

तारुण्यामध्ये जे सुख तिला मिळायला हवे होते, त्यापासून ती पारखी होते. तिचे जीवन म्हणजे या भावभावनांचा एक मोठा संघर्ष आहे. पूर्वीच्या काळी बालविवाह होत असत आणि बऱ्याचदा मुलीचा काहीही दोष नसताना ती विधवा होत असे अशावेळी तिच्या मनातील दाहक आणि प्रभावी वासनांचे चित्रण चौखेर बाली  ही कादंबरी करते. या कादंबरीने बंगाली साहित्यात मानाचे स्थान प्राप्त केले. रवींद्रनाथांचे मानवी जीवनाचे असलेले निरीक्षण आणि मानवी भावभावनांचा असलेला सूक्ष्म अभ्यास याचा पट उलगडलेला यातून दिसून येतो. मानवी जीवनात असलेले कामवासनेचे स्थान आणि त्याचे महत्त्व या कादंबरीत रवींद्रनाथ स्पष्ट करतात.

नौका डुबी  या कादंबरीत हिंदू धर्मात असलेले वैवाहिक निष्ठेचे पावित्र्य आणि त्याची मुळे किती खोलवर रुजली आहे ते रवींद्रनाथ स्पष्ट करतात. मनुष्याचे वेगळेपण हे त्याच्या आचार विचारांवर आणि संस्कारांवर त्याचप्रमाणे आयुष्यात तो करीत असलेल्या मेहनतीवर ठरते असे ही कादंबरी स्पष्ट करते. या कादंबरीत दोन प्रकारची तरुणाई त्यांनी दाखवली आहे. त्यातील एका बाजूला असतो कमलनयन सारखा उदात्त विचारांचा आणि लढाऊ बाण्याचा तरुण आणि दुसऱ्या बाजूला रमेश, योगेंद्र, अक्षय कुमार यांच्यासारखे स्वार्थी आणि सुखलून तरुण. या कादंबरीतील कमला या तरुणीचे पात्र रवींद्रनाथांनी अतिशय सुरेख चितारले आहे. कमला ही स्त्रीच्या स्वाभिमानाचे आणि अस्मितेचे प्रतीक आहे. जीवनात येणाऱ्या संघर्षाचा सामना ती सहनशीलतेने करते पण त्याचबरोबर ती कमालीची आनंदी वृत्तीची आहे. आजही स्त्रियांना सामाजिक जीवनात दुय्यम स्थान देणाऱ्या पुरुषी मनोवृत्तीला ही कादंबरी खूप काही सांगून जाणारी आहे.

# सुगंधा

ज्योतिर्मय साहित्य



उंच उंच नारळाच्या बागा आणि त्या झावळ्या वर बसलेले पक्षी,किनाऱ्यावर पोहचताच होणारा तो वाळूचा स्पर्श,गलबताकडे धाव घेणारी कोळ्यांची पोरं. समुद्राच्या भोवताली असलेल्या किनाऱ्यावर तासनतास घालवलेला वेळ, आल्हाददायक होणारा हवेचा स्पर्श, त्यातून मिळणारा आनंद,  अपर्णाला कायमच शहरातून तिच्या छोट्याश्या समुद्रकिनारी असणाऱ्या गावात ओढून आणायचा. दोन दिवसांनी ती पुन्हा तिच्या कामात व्यस्त असायची.. तिच्या नोकरीच्या निमित्ताने तिला पुन्हा परत जायला लागायचं, मन मात्र तिथच राहिलं आहे सतत असंच वाटायचं तिला. आपल्या स्वतःच्या कामाची जबाबदारी पूर्ण करण्यासाठी मात्र अपर्णा फारच तत्पर होती.

एकेकाळी तिच्या बरोबर मजेत वेळ घालवण्यासाठी भरपूर मैत्रिणी होत्या रोज एकमेकांच्या खोड्या, कधीं चोरुन कैऱ्या पाडून खाणं, शाळेला दांडी मारून खाडी वर जाऊन फेरफटका मारणं, छोट्या छोट्या गोष्टींसाठी रूसवे-फुगवे.. पुन्हा एकत्र येणं.. कधी ते दिवस सरले आणि भरभर ती संसाराच्या कर्तव्याशी वचनबद्ध झाली.

एके दिवशी ती बाजारात गेली असता सावित्री भेटली.. तिची जुनी बालपणीची मैत्रीण, किती आनंद झाला होता. बऱ्याच दिवसांनी भेट घडली आणि जुने दिवस आठवून पुन्हा गत काळात मन रमून गेले. सावित्रीने सगळ्या मैत्रिणींची खुशाली कळवली. पण सुगंधाबद्दल तिने काही सांगितले नाही. सुगंधा नावाप्रमाणेच मनाचा गंध उधळणारी थोडी अल्लड, अवखळ चंचल पण निःस्वार्थी प्रेम करणारी, आपल्या हातातले सगळं काही देऊन रिकामी.. सुगंधा आणि अपर्णा दोघी जवळजवळ राहायच्या एकत्र शाळेत जायच्या. सुगंधाची परिस्थिती बेताचीच पण रोज तीच्यामुळे अपर्णा ला रानमेवा चाखायला मिळायचा..आणि त्याबदल्यात सुगंधा गोळ्या बिस्किटे खायची.. एकमेकांच्या वेण्या ओढून मागे मागे धावत शाळा ते घर आणि घर ते शाळा..फुलांची ओंजळ घेऊन रोज सुगंधा अपर्णाच्या घरी सकाळी देवपूजेला हजर असायची. अपर्णाच्या आईच्या हातचा प्रसाद तिला फार आवडायचा.. अशी सुगंधा घरातल्यांनी नववीत असतानाच तिचं लग्न ठरवून दिले. अचानक निरोप घेऊन तिची आई घरी आली. अपर्णाच्या घरची लोकं त्यांना फार वेळ समजावत होतें..
''एवढ्या कोवळ्या वयात मुलीच्या लग्नाचा विचार करू नका'' पण कोणी ऐकतच नव्हते.

सुगंधा लग्नाआधी खाडीजवळ भेटायला आली. ओंजळीत करवंद,जांभळं घेऊन.. अपर्णाचा जीव तुटत होता तिच्यासाठी. फारच जवळची मैत्रीण दूर निघून जाणार होती, आता तिचे जगच बदलणार होते. सुगंधाचे मन म्हणजे जणु निर्मळ झराच. जाईल तिकडे खळखळून वहायचं... हेच फक्त माहिती होतं तिला.. मैत्रीच्या नात्याला आज ओंजळीतून आणलेला प्रेमाचा गंध कायमचा देऊन गेली सुगंधा.. नवीन आयुष्य सुरू करण्यासाठी चाललेली ती आणि अपर्णाच्या मनात फक्त किनाऱ्यावरची आठवण उरली होती.



प्रतिभा महादेव चौगले,
कोल्हापूर

## जात्यावरच्या ओव्या......



नातेसंबंध : नणंद-भावजय

सीता भावजयी
कुंकू लाव कोरणीच
गावा गेलं बाई
सोनं माझ्या मोरणीचं ll४६ll

सांगावा धाडते
नाही आला सांगल्यान,
कठीण केलं मन
मह्या  दादा रंगील्यानं ll४७ll

संदर्भ- शांताई इंगळे
संकलन- सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

# मोफत चिकित्सा व शिबिराचे आयोजन

ज्योतिर्मय साहित्य
छत्रपती संभाजीनगर

– श्रीयश आयुर्वेदिक महाविद्यालय आणि रुग्णालय सातत्याने मोफत तपासणी शिबिराचे आयोजन करत असते. एक सामाजिक उपक्रम म्हणून या अगोदर देखील कांचनवाडी, सातारा, नक्षत्रवाडी इत्यादी ठिकाणी अशी शिबिरे घेतली आहेत. श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष बसवराज मंगरुळे ह्यांच्या उद्दिष्टयांनुसार आयुर्वेदासारख्या भारतीय पारंपरिक चिकित्सा पद्धतीचा वापर, प्रचार आणि प्रसार सामान्य, गरीब, आणि वृद्ध व्यक्तींसाठी व्हायला पाहिजे. त्याचसाठी श्रीयश आयुर्वेदिक महाविद्यालय आणि रुग्णालय कार्यरत असून रुग्णांना इलाज, औषधें आणि चिकित्सा सुविधा मोफत उपलब्ध करून देत आहे.

हेच उद्दिष्ट समोर ठेऊन आज सकाळपासून श्रीयश आयुर्वेदतर्फे मोफत चिकित्सा आणि शिबीराचे आयोजन सातारा परिसरातील अहिल्याबाई होळकर स्मारक सभागृहात करण्यात आले होते. ह्यात चार तज्ञ डॉक्टरांकडून मोफत तपासणी, लॅब चाचण्या करून त्वरित रिपोर्ट्स, आणि मोफत औषधोपचार करण्यात आले. डॉक्टरांसोबतच, पॅथॉलॉजिस्टस, लॅब चाचणी सुविधा आणि नर्स स्टाफ देखील कार्यरत होता. आपल्या घराजवळच वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या ह्या शिबिराचा चारशेपेक्षा जास्त रुग्णांनी लाभ घेतला. बसवराज मंगरुळे, अध्यक्ष, श्रीयश प्रतिष्ठान, ह्यांनी ह्या सामाजिक उपक्रमाच्या यशस्वीतेबद्दल आयोजकांचे अभिनंदन केले.




# नव्या बदलाची नांदी ! भारतीय विद्यार्थ्यांना आता ऐ आय आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित शिक्षण !!

ज्योतिर्मय साहित्य

नव्या शैक्षणिक धोरणातील घटकांच्या निकषांनुसार संरचनात्मक विकास, नवकल्पनांचे तत्त्वज्ञान, प्रगत माहिती तंत्रज्ञानाचा वापर यादृष्टीने या शाळा २१व्या शतकात आदर्श व नमुनेदार बनतील. त्यांच्या सर्वांगीण आणि परिपूर्ण विकासामुळे शैक्षणिक कौशल्यांच्या अंमलबजावणीचा एक नवा प्रयोग कृतीत येईल. २०२२ ते २०२७ या पाच वर्षांच्या काळात या योजनेवर २७३६० कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. म्हणजे नव्या योजनेचा हा एक प्रभावी प्रयोग असेल. नवीन शैक्षणिक धोरणाचे पडसाद राष्ट्रीय जीवनामध्ये दिसू लागतील हे मन्वंतर गतीने घडावे म्हणून प्रगत व कालसापेक्ष आणि गतिमान असा कृती आराखडा तयार केला जात आहे. त्यामुळे शिक्षणाबरोबरच राष्ट्रीय विकासाच्या सर्व क्षेत्रांत नवचैतन्य येईल आणि देश आत्मनिर्भर व स्वावलंबी बनू शकेल. लोकमान्य टिळकांचे राष्ट्रीय शिक्षणाचे आणि महात्मा गांधींच्या नई तालीम मधील जीवनोपयोगी शिक्षणाचे स्वप्न अमृतमहोत्सवी वर्षात निश्चितपणे साकार होईल यात शंका नाही. या अनुषंगाने नवीन शैक्षणिक धोरणात कृती आराखड्याबाबत एक स्वंतत्र प्रकरण दिले आहे. तसेच भारतासारख्या विकसनशील राष्ट्राला उदार कलाशिक्षणाची आवश्यकता आहे हे लक्षात घेऊन कला, मानवी विद्या तसेच विज्ञान-तंत्रज्ञान यातील संशोधन व विस्तार कार्यात समन्वयाची आवश्यकता आहे. भारतीय प्रश्नांना भारतीय उत्तरे देण्याचे सामर्थ्य नवीन शैक्षणिक धोरणात आहे. हे धोरण सर्वांग परिपूर्ण, उत्तम तेवढेच व्यवहार्य आहे. त्याच्या आदर्श तत्त्वज्ञानाची, मूल्यांची व्यवहारात पेरणी व अंमलबजावणी व्हावी यादृष्टीने विशेष प्रयत्नांची आवश्यकता आहे. प्रत्येक विद्यापीठात नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र कक्ष विकसीत करण्याची व विशेष सल्लागार नियुक्त करण्याची सूचना विद्यापीठ अनुदान आयोगाने केली आहे.

यादृष्टीने विचार करता शालेय शिक्षण, महाविद्यालयीन शिक्षण, विद्यापीठीय शिक्षण आणि संशोधनावर आधारलेले शिक्षण या प्रमुख क्षेत्रांत अंमलबजावणीसाठी कार्यदल विकसीत करून भारताच्या विविध घटकराज्यात शैक्षणिक धोरणाबाबत जाणीव-जागृती, समन्वय आणि कृतीनियोजनाची विशेष आवश्यकता आहे. तसे झाले तर प्रगत शिक्षणाच्या आधारे भारत; अमेरीका, चीन, रशिया व फ्रान्स या देशांच्या अर्थव्यवस्थांना मागे टाकून आपली अर्थव्यवस्था अधिक सुदृढ आणि सक्षम करण्यासाठी वाटचाल करू शकेल. आत्मनिर्भर भारताच्या भावी वाटचालीस अर्थव्यवस्था, संरचना, समग्र प्रशासकीय व्यवस्था, प्रबल लोकसंख्या तसेच विकासप्रेरक मागणी या प्रमुख पाच स्तंभांवर भर देऊन नवी झेप घ्यावी लागेल. अशी उत्तुंग झेप घेण्यासाठी भारतातील तरुणांना त्यांच्या पंखात बळ देण्यासाठी नवे शैक्षणिक धोरण प्रेरक ठरू शकेल.

फिटे अंधाराचे जाळे, झाले मोकळे आकाश, दऱ्या खोऱ्यांतून वाहे प्रकाश प्रकाश... असा ज्ञानाचा नवा प्रकाश नव्या धोरणामुळे देशाच्या कानाकोपऱ्यात पसरला तर महानगरे व खेडी तसेच आदिवासी डोंगराळ प्रदेश आणि नागरी वसाहती श्रीमंत आणि गरीब, विकसीत आणि अविकसीत भाग यांतील अंतर कमी करणे शक्य होईल. तसेच डिजीटलायझेशनच्या युगात शहरे व खेडी यात पडत असलेले अंतर हे सुद्धा कमी करता येवू शकेल. नव्या धोरणाने भारताच्या इतिहासातील सुवर्णयुगाची आणि समृद्धीची नवी पहाट उदयास यावी अशी अपेक्षा आहे.



डॉ. वि. ल. धारूरकर, पुणे
मो. ९२२५३१३५९२

पुण्यातील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ नॉलेज या संस्थेने शैक्षणिक क्षेत्रात गेली २१ वर्षे कार्यरत राहून ज्ञानगंगा नावाने मराठी भाषेतील पहिला डिजिटल विश्वकोष केला आहे. अलीकडच्या काळात राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या मुख्य प्रवाहात उतरून   परख ही प्रणाली विकसित केली आहे जी एआय-संचालित असून, सतत आणि व्यापक मूल्यांकना (सीसीई) साठी अत्यंत उपयुक्त प्रणाली आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे अशा अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरून शाळा महाविद्यालय आणि विद्यापीठ पातळी वर सर्व विद्यार्थ्यांना जोडण्यासाठी महत्वाची कामगिरी करण्यासाठी प्रयत्न केला आहे. विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि संस्थेच्या व्यवस्थापनात ग्रोविंग डॉट्स परख आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी कार्यरत झाले आहे आणि केवळ महाराष्ट्र राज्य नव्हे तर भारतीय स्तरावर कर्नाटक, मध्यप्रदेश, गोवा, छत्तीसगड, उत्तरप्रदेश, गुजरात, राजस्थान आणि दिल्लीतही अनेक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जात आहे. दररोजच्या रोज या राज्यातील विविध माध्यमाच्या संस्था याचा लाभ घेत आहेत आणि ऐ-आयच्या माध्यमातून गुणवत्ता, कौशल्य विकास व स्पर्धा परीक्षेत प्राविण्य मिळवण्यासाठी पायाभरणी करीत आहेत.

या विषयाच्या अनुषंगाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ नॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या गुरुवार दिनांक २४ एप्रिल २०२५ रोजी एक महत्त्वाचा परिसंवाद आयोजित करण्यात आलेला आहे. या परिसंवादात सुमारे १०० हून अधिक पुणे आणि परिसरातील महत्त्वाच्या शिक्षण संस्थांचे अध्यक्ष, सचिव, प्राचार्य, मुख्याध्यापक आणि प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. त्या अनुषंगाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, एआय आणि ग्रोविंग डॉट्स परख या संदर्भात विस्तृत चर्चासत्र आयोजित केले गेले आहे सर्वांनी याचा लाभ घ्यायला हवाचं !

***

## संस्कृती व संस्कार



विभावरी कुलकर्णी,
मो. ८०८७८१०१९७

### गोष्टी प्राण्यांच्या १३

ज्योतिर्मय साहित्य

ज्या प्राण्याची भीती वाटायची, तोच प्राणी नंतर फारच जवळचा झाला. आपल्या हातात काहीच नसते. बरेच प्रसंग आपल्या आयुष्याला कलाटणी देणारे घडतात. माझेही तसेच झाले. एक दिवस माझा मानलेला भाऊ घरी आला. आणि म्हणाला,   माझा मित्र गावाला गेला आहे. आणि त्याच्याकडे एक कुत्रा आहे. त्याला दोन तीन दिवस आपल्या घरी ( त्याचे घर लहान असल्याने ) सांभाळू. मी त्याचे सगळे करेन. खूप शांत व गुणी आहे. तो एका कोपऱ्यात शांतपणे राहील. त्याने असे म्हटल्यावर अनेक शंका, कुशंका घेत त्या कुत्र्याला घरी आणण्याची परवानगी दिली. आणि तो कुत्रा आमच्या घरात दाखल झाला. तो एक पांढऱ्या रंगाचा, चांगल्या खात्या पित्या घरचा सुदृढ होता. विशेष म्हणजे त्याला गळ्यात पट्टा घालून घेण्याची सवय नव्हती. आणि बांधून ठेवणे याची पण सवय नव्हती. तो मालकाच्या घरात असाच मुक्तपणे रहायचा. पण मी अट घातली होती, म्हणून त्याला पट्टा घातला होता आणि साखळी पण बांधली होती.

तो घरात आल्यावर त्याने नवीन घर बघून घेतले. सगळीकडे घरात अर्थात भावाबरोबर फिरुन आला. जणू आपल्याला कुठे रहायचे आहे, हे बघत होता. घरातील प्रत्येकाचा त्याने परिचय करुन घेतला. अर्थात त्याच्या पद्धतीने म्हणजे प्रत्येकाचा वास घेतला. आणि तो ज्या व्यक्तीजवळ जात होता, त्या व्यक्तीचे नाव व ती व्यक्ती काय करते हे भाऊ त्याला सांगत होता. माझ्याजवळ आल्यावर मी आपली पाय वर घेऊन गुपचुप बसले. आणि आमचा परिचय झाला. लगेच त्याला एका कोपऱ्यात बांधले गेले. आणि तो आपल्या दोन पायांच्या मध्ये तोंड ठेवून बसला. त्याला बांधलेले असले तरी घरात वावरताना माझे लक्ष सतत त्याच्याकडे असायचे. तोही मी जाईल तिकडे डोळे नेऊन बघत रहायचा. मनात मात्र मी सतत म्हणत होते, फक्त दोन दिवस तर राहणार आहे. आणि माझी शाळा दिवसभर असल्याने मी बराच वेळ बाहेरच असणार होते. पण घरात असताना भीती आणि उत्सुकता दोन्ही वाटायची. त्याचा एक दिवस जरा अस्वस्थतेत गेला. मग कळले, त्याला बांधून ठेवल्यामुळे तो अस्वस्थ होता. मग थोडा वेळ त्याला साखळी व पट्टा याशिवाय ठेवले. त्यावेळी त्याला भावाने सांगितले होते, इथेच बसायचे. घरात फिरायचे नाही. आणि खरेच तो दोन तीन तास घरात तसाच बसून राहिला होता. त्याचे डोळे मात्र मोठे बोलके होते. त्याच्या डोळ्यात कृतज्ञता, कारुण्य, समाधान, भूक लागली, बाहेर जायचे अर्थात शी शू साठी. हे सगळे समजायचे. तो आनंद व्यक्त करताना सुद्धा शेपूट हळूहळू हलवायचा. तो पर्यंत त्याचे बरेच गुण भावाने सांगितले होते. मी फारसे लक्ष न देता ऐकले कारण दोन दिवसांचा तर प्रश्न होता. नेमके त्याच्या मालकाला काही काम निघाले. आणि या कुत्र्याचा मुक्काम वाढला. आणि भाऊ त्याच्यासाठी वेळ काढून किती थांबणार? नाईलाजाने मी त्याची जबाबदारी घेतली. तो पर्यंत कुत्र्याचे काही गुण लक्षात आले होते. नंतर त्याची माहिती मिळवली. तो लॅब्रेडर जातीचा कुत्रा होता. या जातीचे कुत्रे

अतिशय हुशार आणि समजूतदार असतात. यांना विशेष ट्रेनिंग देऊन तयार करतात. पोलिस तपास करताना या जातीची कुत्री फार उपयुक्त ठरतात. चांगल्या व्यक्तीवर हल्ला करत नाहीत. अशी माहिती मिळाल्यावर माझे त्याच्या विषयीच्या मतात बदल झाला. नंतर आठ पंधरा दिवस त्याचा मुक्काम झाल्यावर त्याचा चांगलाच लळा लागला. आणि नंतर तो आमच्याच घरातील एक सदस्य बनला.

आपण बोललेले मात्र त्याला कळायचे. आणि आपल्या बोलण्याला प्रतिसाद द्यायचा. त्याने कधीच काहीच त्रास दिला नाही. उगीच हावरट असल्या सारखे जास्त खाल्ले नाही. माझ्या कामाच्या वेळा त्याने बरोबर लक्षात ठेवल्या होत्या. पूजेची वेळ झाली, की माझ्याकडे व देवघराकडे आलटून पालटून बघायचा. कधी तोंडाने आवाज काढून सूचना द्यायचा. मी देवा समोर जाऊन बसले की माझ्याकडे शांतपणे बघत बसायचा. एक दिवस तर त्याला गडबडीत फिरायला न्यायचे राहून गेले. शाळेत गेल्यावर लक्षात आले. असे वाटले आता हा घर घाण करणार. घरी आल्यावर बघितले तर सगळे स्वच्छ होते. मग पटकन त्याला घेऊन गेले. घरी आल्यावर बघितले तर त्याच्या डोळ्यातील भाव बघून वाटले, याला जर बोलता आले असते, तर याने थोडा वैताग आणि आभार व्यक्त केले असते. अशा अनेक गमती जमती,विविध अनुभव घेत त्याचे आणि आमचे जमले. मात्र एक होते, जाताना त्याला सांगून जायचे. नाहीतर तो सारखे दरवाजा कडे बघून वाट बघत अस्वस्थ व्हायचा.  प्राणी असाही जीव लावतात. आणि आपलेसे करतात. इतके दिवस फक्त चित्रपटात बघितले होते. पण आता हा घरातील सदस्य विविध अनुभव देत होता. कोणाला बरे वाटत नसेल तर त्या व्यक्ती जवळ दिवसातून ७/८ वेळा तरी जायचा. जणू त्या आजारी माणसाची विचारपूस करत असे.  असेच काही अनुभव पुढील लेखात वाचू.

# एक थोर स्वातंत्र्यसेनानी–रावसाहेब पटवर्धन

ज्योतिर्मय साहित्य

१९२० साली लोकमान्य टिळक यांचे देहावसान झाले आणि एका चैतन्यशील राजकीय कालखंडाचा शेवट झाला. त्यानंतर, राजकारणाची सुत्रे महात्मा गांधी यांच्याकडे आली. १९२० च्या अखेरीस नागपूरला जे काँग्रेस पक्षाचे अधिवेशन झाले, त्यामध्ये असहकारितेची कल्पना विविध कार्यक्रमाव्दारे स्पष्ट करण्यात आली. या निश्चीत कार्यक्रमामुळे स्वातंत्र्य आंदोलनाची कल्पना सर्वसामान्यांपर्यंत नेता आली. सर्व तरुणांमध्ये उत्साह निर्माण झाला. देशासाठी प्रत्येक जण स्वार्थ त्याग करू शकतो ही भावना समाजात निर्माण झाली होती त्यास अधिक बळ मिळाले. स्वातंत्र्य लढ्यात नवचैतन्य आणि सामर्थ्य निर्माण झाले. सत्याग्रहाचे वारे वाहू लागले. या प्रवासात रावसाहेब पटवर्धन आणि अच्युतराव पटवर्धन आघाडीवर राहिले. देशभक्तीचे संस्कार बालपणापासून लोकमान्य टिळकांच्या रूपाने झालेल्या रावसाहेब पटवर्धन यांना विद्यार्थी दशेत ऐन तरुण वयात असतानाच गांधीवादाचा संस्कार मिळाला. त्यांच्या कर्तुत्वाची सुरवातच गांधीयुगात झाली. १९२० च्या दशकात फेरवादी व नाफेरवादी म्हणजेच कौन्सिल प्रवेशाला अनुकूल व प्रतिकुल हा वाद चांगलाच रंगला. जवळ जवळ १० वर्षे त्यात गेली. कौन्सिल प्रवेशाचा फारसा उपयोग होत नसल्याची जाणीव मोतीलाल नेहरू यांच्यासारख्या नेमस्त नेत्यांना होऊ लागली. काय करावे, काय करू नये यावर एकमत होईना. याच सुमारास १९२९ साली सायमन कमीशन भारतात आले आणि या सायमन कमीशनवर बहिष्कार घालण्याचा काँग्रेसने निर्णय घेतला. सायमन कमीशनच्या निषेधार्थ लाहोर येथे प्रचंड निदर्शने झाली. त्यावेळी झालेल्या लाठीमारात पंजाबचे नरकेसरी लाला लजपतराय जखमी होऊन त्यांतच त्यांचा अंत झाला. देशातील वातावरण संतप्त व तंग झाले. जनमानसाच्या नाडीवर अचूक हात असलेल्या महात्मा गांधी यांनी सत्याग्रहाचे रणशींग फुकले. स्वातंत्र्यलढ्यात देशभर तरुणांनी धडाधड उड्या घेतल्या. तुरुंगवास पत्करला; लाठ्या काठ्यांचा मार सहन केला तसेच बंदुकीच्या गोळ्यांनाही शौर्याने तोंड दिले. तुरुंगात असतांना स्वातंत्र्यप्रेमाबरोबर त्या स्वातंत्र्याचा अर्थ काय? आशय कोणता? यावर विचारमंथनाला प्रारंभ झाला. एका नव्या विचाराने, नव्या ध्येयाने प्रेरीत होऊन तरुण मंडळी तुरुंगाबाहेर पडली. त्यात रावसाहेब पटवर्धन आणि अच्युतराव पटवर्धन हे दोन बंधू पुढील काळात देशास परिचित झालेले दोन समाजवादी विचारसरणीचे तरुणही होते. एका नव्या कालखंडाची ही सुरवात होती. हा कालखंड जवजवळ स्वातंत्र्य मिळेपर्यंत चालला. देव-देवगिरीकर, जेधे-गाडगीळ आणि नव्या विचारांच्या तरुण मंडळींचे नेतृत्व करणाऱ्या पटवर्धन बंधूंनी हा कालखंड गाजविला. रावसाहेब पटवर्धन यांचा १९२९-३० च्या लढ्यातील पहिला तुरुंगवास. हा तुरुंगवास विचारमंथन करण्यासाठी तरुण क्रांतीकारकांना महत्वाचा ठरून स्वातंत्र्यलढ्याला दिशा देण्यास उपयोगी पडला. १९३०, १९३२, १९३९, व १९४२ अशा चारही स्वातंत्र्यलढ्यात रावसाहेब पटवर्धन यांनी दीर्घ मुदतीचा, कष्टमय, हालअपेष्टांची परिसीमां गाठणारा कारावास भोगला. बनारस येथे उच्च शिक्षण घेतलेल्या रावसाहेब पटवर्धन यांना प्राध्यापक, संशोधक, वकील म्हणून लौकिक मिळवता आला असता, पण देशातील आस्थिर परिस्थितीने त्यांना अंतर्मुख केले व आपले सारे जीवन त्यांनी देशसेवेसाठी वेचायचा निर्धार केला. त्यांनी महात्मा गांधीजींच्या संघर्षात्मक व विधायक अशा दोन्ही कार्यात सक्रीय सहभाग घेतला. खादी व ग्रामोद्योग, अस्पृश्यता निर्मूलन, हिंदू-मुस्लीम ऐक्य व दारूबंदी या गांधीजींच्या चतु:सूत्री याचा आयुष्यभर त्यांनी पाठपुरावा केला. रावसाहेब पटवर्धन यांचा जन्म अहमदनगरमधील प्रसिद्ध ठिळकपंथीय वकील हरी केशव पटवर्धन यांच्या सधन, सुसंस्कृत कुटुंबात



झाला. रावसाहेब यांची जन्मतारीख १५ जुलै १९०३. त्यांचे वडील हरी केशव पटवर्धन हे लोकमान्य टिळकांचे स्नेही आणि पुरस्कर्ते आणि नाणावलेले वकील. हरी पटवर्धन यांचे विचार पुरोगामी स्वरूपाचे होते. डॉ. ॲनी बेझंट यांच्या थिऑसॉफिस्ट विचारांचा त्यांच्या मनावर पगडा असे. रावसाहेबांचे नांव पुरुषोत्तम असे ठेवण्यात आले होते. त्यांना सर्व राऊ म्हणत असत. राऊचे रावसाहेब हे नांवच पुढे लोकप्रिय झाले. रावसाहेब पटवर्धन नावाप्रमाणेच रूपवान आणि बुद्धीमान होते. रावसाहेब यांच्यापाठोपाठ अच्युतराव, जनार्दनपंत, बाळासाहेब, पद्माकर, मधुकर आणि विजयाताई ही भावंडे जन्माला आली. महाराष्ट्रांत



शिरीष चिटणीस

बालवीर चळवळीचे बीज हरी केशव पटवर्धन यांनी प्रथम अहमदनगरला पेरले. या संस्कारात रावसाहेबांचे सारे बालपण गेले. विद्यार्थ्यांचे इंग्रजी सुधारावे आणि त्यांच्या ज्ञानात चौफेर भर पडावी हा हरीभाऊंचा कटाक्ष असे. या बहुश्रुत वातावरणातच पटवर्धन बंधूंची वाढ झाली. प्रसिद्ध लेखकांच्या कादंबऱ्यातील उतारेचे उतारे रावसाहेबांना मुखोदगत असत. त्यामुळे वक्तृत्वाच्या चढाओढीत त्यांनी अनेक बक्षीसे पटकावली त्यांच्या घरातच बालवीर चळवळीचे वातावरण असल्यामुळे प्रतिदिनी सत्कृत्ये करणे हा बालवीर धर्म ते कटाक्षाने पाळीत असत. सायंकाळी क्रीडांगणावर जाऊन ते नियमीत व्यायाम घेत असत. डॉ.ॲनी बेझंट आणि लोकमान्य टिळक यांच्या होमरूल लीगचे काम हरीभाऊ पटवर्धन करीत असत. डॉ. ॲनी बेझंट अहमदनगरला आल्या कि, त्यांचा मुक्काम पटवर्धन वाड्यातच असायचा. त्यांच्या थिऑसॉफिस्ट विचारांचा पगडाही लहानपणापासूनच रावसाहेब यांच्यावर होता. रावसाहेब पटवर्धन यांचे शिक्षण नगरच्या सोसायटी हायस्कूलमध्ये झाले.

हरीभाऊंनी त्यांच्या मुलावर आणि परिसरातील मुलांवर देशभक्तीचे संस्कार केले. आपला मुलगा सुसंस्कृत, सदाचारी व सत्प्रवृत्त व्हावा या सदिच्छेने हरीभाऊंनी रावसाहेबांना मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर बनारस येशील हिंदू विद्यापीठात पाठविले. त्याठिकाणी डॉ. ग्यानचंद्र, प्रा. तेलंग यांसारख्या विद्वान, व्यासंगी व्यक्तीशी त्यांचा संबंध येऊन रावसाहेबांचे ज्ञान सखोल झाले. त्याचवेळी अखिल भारतीय वर्क्तृत्व स्पर्धेत त्यांचा पहिला क्रमांक येऊन त्यांना सुवर्णपदक मिळाले. नंतर त्यांनी पुण्याला येऊन कायद्याच्या परीक्षा दिल्या. विद्यार्थ्यांनी वाचन करून सांस्कृतिक कार्यात भाग घ्यावा यासाठी त्यांनी या काळात नचिकेत मंडळ या नावाची संस्था काढली. प्रसिद्ध कवी हरिंद्रनाथ चटोपाध्याय हेही या कार्यात भाग घेत असत. वकिलीची परीक्षा उतीर्ण झाल्यावर वकिलीची प्रॅक्टीस करण्याऐवजी त्यांनी गांधीजींच्या कार्यात लक्ष घातले. निष्ठा, तपस्या व वक्तृत्व याच्या बळावर नगर जिल्ह्यात ठिकठिकाणी त्यांनी देशप्रेमाचे व देशसेवेचे वातावरण निर्माण केले. १९३० सालच्या कायदेभंगाच्या चळवळीत नगर जिल्हा सदैव आघाडीवर तळपला तो रावसाहेबांच्या प्रेरणेनेच ! या चळवळीचे नेतृत्व नगर जिल्ह्यामध्ये त्यांनी केले. त्यावेळी कारागृहात त्यांना दीर्घकाळ काढावा लागला मुक्ततेनंतर ते महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसचे पदाधिकारी होते. महाराष्ट्रातील राजकारणाची धुरा समर्थपणाने वाहत असतांनाच अखिल भारतीय काँग्रेस समितीमध्येही मानाचे स्थान त्यांना मिळाले. पंडीत जवाहरलाल नेहरू यांचा पटवर्धन बंधूंवर अपार विश्वास होता, तथापि सत्तेतील मानाचे पान स्वीकारण्यास ते कधीही पुढे आले नाहीत. त्यांनी सर्वोदय कार्याला वाहून घेतले. त्यांचा मन:पिंड लहानपणापासूनच तत्वविवेचकाचा असल्यामुळे जे. कृष्णमूर्ती यांच्याही मतांचा त्यांच्यावर प्रभाव पडलेला असे. सेवादलातही त्यांनी नेत्रदीपक उत्तुंग कामगिरी केलेली आहे. सेवापथक, भूदानपथक, संरक्षण कार्य या सर्व क्षेत्रात रावसाहेबांनी मोलाचे मार्गदर्शन केले. वृत्तपत्रसृष्टीतही रावसाहेब पटवर्धन यांची कामगिरी स्पृहणीय आहे. नगरला संघशक्ति या नावाचे साप्ताहिक काढून जनतेची गाऱ्हाणी दूर करण्याचे कार्य त्यांनी केले. साने गुरुजींच्या निधनानंतर साधना साप्ताहिकाचे ते संपादक झाले. साधने तूनही त्यांनी राजकारणाचे मार्गदर्शन केले. देशातील वृत्तपत्रांचे परिस्थितीचे नीट निरीक्षण करून वृत्तपत्रे व पत्रकार यांच्या संबंधी केंद्र सरकारला शिफारशी करण्याकरीता न्यायमूर्ती राजाध्यक्ष यांच्या नेतृत्वाखाली सरकारने जे मंडळ नेमले होते त्या प्रेस कमीशनचे रावसाहेब हे सदस्य होते.

(क्रमश:)

# जागतिक पशुवैद्यकीय दिन




ज्योतिर्मय साहित्य

दरवर्षी एप्रिल महिन्याच्या शेवटच्या शनिवारी मोठ्या उत्साहाने जागतिक पशुवैद्यकीय दिन साजरा केला जातो आणि २०२५ मध्ये हा महत्त्वपूर्ण दिवस २६ एप्रिल रोजी येत आहे. या वर्षी जागतिक पशुवैद्यकीय दिनाची थीम ‘‘पशु आरोग्य: एक टीम वर्क‘‘ अशी आहे. ही थीम पशुवैद्यकीय सेवांच्या सहकार्यावर आधारित स्वरूपावर आणि उच्च-गुणवत्तेच्या पशुवैद्यकीय सेवा देण्यासाठी अनेक व्यावसायिकांच्या आवश्यक भूमिकेवर प्रकाश टाकते.

हा जागतिक स्तरावरील कार्यक्रम पशुवैद्यकीय व्यावसायिकांच्या महत्त्वपूर्ण योगदानाला आदराने समर्पित आहे. हे व्यावसायिक केवळ पाळीव प्राण्यांचे आरोग्य आणि कल्याणच नव्हे, तर मानवी आरोग्य आणि आपल्या सभोवतालच्या पर्यावरणाच्या संरक्षणासाठीही अविरतपणे कार्यरत असतात. त्यांची निष्ठा, प्राण्यांमधील रोगांचे अचूक निदान करण्याची क्षमता आणि त्यांना बरे करण्याची कुशलता, तसेच सार्वजनिक आरोग्याचे रक्षण करण्याची त्यांची कटिबद्धता याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस आहे.

पशुवैद्यकीय व्यावसायिक समाजात एकापेक्षा जास्त महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. ते केवळ आजारी जनावरांवर प्रेमळपणे उपचार करत नाहीत, तर ते सांसर्गिक रोगांचे बारकाईने सर्वेक्षण आणि प्रभावी नियंत्रण ठेवण्यातही मोलाची भूमिका निभावतात. विशेषत: प्राणीजन्य रोगांचा (जनावरांपासून माणसांमध्ये पसरणाऱ्या रोगांचा) फैलाव रोखण्यासाठी ते अथक प्रयत्न करतात, ज्यामुळे मानवी समाजाचे आरोग्य सुरक्षित राहते. यासोबतच, पशुधन आणि प्राण्यांपासून मिळणाऱ्या खाद्यपदार्थांची काटेकोर तपासणी करून आपल्या अन्नपुरवठ्याची गुणवत्ता आणि सुरक्षितता सुनिश्चित करण्याची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी ते उत्तम प्रकारे पार पाडतात. केवळ एवढेच नव्हे, तर प्राण्यांचे कल्याण जपण्या साठी, त्यांच्या वरील अत्याचार आणि दु:खे कमी करण्यासाठी ते सतत जागरूक असतात आणि आवश्यक उपाययोजना करतात. पशुवैद्यकीय विज्ञान आणि संशोधनाच्या क्षेत्रात त्यांचे योगदान अमूल्य आहे आणि वन्यजीवनाचे संरक्षण करण्याच्या प्रयत्नांमध्येही त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

‘‘पशु आरोग्य: एक टीम वर्क‘‘ ही २०२५ ची थीम पशुवैद्यकीय सेवांमधील एकत्रित प्रयत्नांच्या महत्त्वावर जोर देते. एका जनावराच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी अनेक लोक एकत्र काम करतात, ज्यात पशुवैद्यक, पशुवैद्यकीय तंत्रज्ञ, परिचारिक, प्रयोगशाळे. तील सहाय्यक आणि इतर संबंधित कर्मचाऱ्यांचा समावेश असतो. या टीममधील प्रत्येकाची भूमिका महत्त्वाची असते आणि त्यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळेच प्राण्यांना उत्तम आरोग्य सेवा मिळू शकते.



डॉ.श्याम वा.कुलकर्णी, पुणे

भारतीय संस्कृतीमध्ये पशूंना नेहमीच आदराचे स्थान दिलेले आहे आणि त्यांची काळजी घेणे हे महत्त्वपूर्ण मानले गेले आहे. प्राचीन ग्रंथांमध्ये आणि लोक कथांमध्ये पशुंच्या आरोग्या ची काळजी घेणाऱ्या व्यक्तीं चा उल्लेख आढळतो. जरी पशुवैद्यक ही एक आधुनिक आणि विशिष्ट व्यावसायिक ओळख असली तरी, त्या काळात प्राण्यांच्या रोगांचे ज्ञान असणारे आणि त्यांच्या वर उपचार करणारे लोक समाजात निश्चितपणे महत्त्वाचे मानले जात होते.

आपल्या पौराणिक कथांमध्ये नकुल सहदेवां सारख्या पात्रांचा उल्लेख आढळतो, ज्यांना घोड्यांच्या आणि इतर जनावरांच्या आरोग्याचे विशेष ज्ञान होते असे मानले जाते. त्यांना त्यावेळचे पशुवैद्यक म्हणून ओळखले जाऊ शकते, जे आपल्या ज्ञानाचा उपयोग जनावरांना निरोगी ठेवण्या साठी करत होते. या कथा भारतीय संस्कृतीतील प्राण्यांच्या आरोग्याच्या महत्त्वावर आणि त्यांची काळजी घेणाऱ्या व्यक्तींच्या भूमिकेवर प्रकाश टाकतात.

याव्यतिरिक्त, प्राचीन भारतीय साहित्यात शालिहोत्र ऋषी हे अश्वशास्त्र आणि पशुवैद्यकशास्त्रातील एक आदरणीय व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जातात. त्यांना भारतातील पहिल्या पशुवैद्यकाचा मान दिला जातो. शालिहोत्रांनी शालिहोत्र संहिता नावाचा एक विस्तृत ग्रंथ लिहिला, जो घोड्यांच्या आरोग्य आणि व्यवस्थापनावर आधारित आहे. या ग्रंथात घोड्यांच्या विविध रोगांचे निदान, त्यांचे उपचार आणि त्यांची काळजी कशी घ्यावी याबद्दल सखोल माहिती दिलेली आहे. शालिहोत्रांचे कार्य केवळ घोड्यांपुरते मर्यादित नव्हते, असे मानले जाते. त्यांनी इतर पाळीव जनावरांच्या आरोग्यासंबंधीही महत्त्वपूर्ण योगदान दिले.

जागतिक पशुवैद्यकीय दिनाच्या निमित्ताने आपण आधुनिक पशुवैद्यकीय व्यावसायिकांच्या कार्याचा गौरव करतोच, पण त्याच बरोबर शालिहोत्रांसारख्या आपल्या प्राचीन वैद्यांचे स्मरण करणे आणि त्यांच्या कार्याचा आदर करणेही महत्त्वाचे आहे. त्यांनी घालून दिलेल्या ज्ञानाच्या पायावरच आजचे पशुवैद्यकीय विज्ञान उभे आहे, हे आपण कधीही विसरू नये. यावर्षीच्या ‘‘पशु आरोग्य: एक टीम वर्क‘‘ या थीमच्या अनुषंगाने, आपण सर्व पशुवैद्यकीय व्यावसायिक आणि त्यांच्या टीममधील सदस्यांच्या एकत्रित प्रयत्नांना सलाम करूया, जे प्राण्यांच्या आरोग्याची आणि कल्याणाची काळजी घेण्यासाठी समर्पित आहेत.

***

# सार्वभौमत्वावर हल्ला !

ज्योतिर्मय साहित्य

काश्मीरला विशेष दर्जा देणारे ३७० वे कलम हटवून केंद्र सरकारने काश्मीरचे त्रिभाजन केले. या घटनेला या ऑगस्ट मध्ये सहा वर्ष पूर्ण होतील. ३७० वे कलम हटवल्यानंतर काश्मीरमध्ये अनुचित प्रकार घडू नये यासाठी काश्मीरमध्ये कडेकोट सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती. कडेकोट सुरक्षा व्यवस्था असल्याने काश्मीरमध्ये बराच काळ शांतता होती त्यामुळे पर्यटनालाही चालना मिळाली होती. त्यामुळे नंदनवनात पुन्हा शांतता प्रस्थापित झाली असा समज निर्माण झाला होता मात्र या समजाला छेद देणारी घटना काश्मिरात घडली आहे. जम्मू काश्मीरमधील अनंतनाग जिल्ह्यातील पहलगाम येथे पाक पुरस्कृत दहशतवाद्यांनी पर्यटकांवर केलेल्या भ्याड हल्ल्यात २८ पर्यटक ठार झाले. या हल्ल्यात अनेक पर्यटक जखमी झाले. ठार झालेल्या पर्यटकात महाराष्ट्रातील सहा पर्यटकांचा समावेश आहे. या हल्ल्याने देशभर संतापाची लाट उसळली आहे . पहलगाम येथे झालेला हा हल्ला भारताच्या सार्वभौमत्वावर झालेला हल्ला आहे. या हल्ल्याने काश्मीरमध्ये दहशतवाद्यांनी पुन्हा डोके वर काढले असून काश्मीरमध्ये पुन्हा घातपाती कारवाया सुरू झाल्याचे स्पष्ट झाले आहे. या हल्ल्याने सहा वर्षापूर्वी काश्मीरमधीलच पुलवामा येथे झालेल्या हल्ल्याची आठवण झाली. सहा वर्षापूर्वी पाकिस्तानच्या जैश ए मोहंमद या दहशतवादी संघटनेने भारतीय जवानांवर केलेल्या हल्ल्यात ४० हून अधिक जवान शहीद झाले होते. पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यात दहशतवाद्यांनी पर्यटकांना त्यांचा धर्म विचारुन ठार केले. दहशतवाद्यांनी हिंदू पर्यटकांना जाणीवपूर्वक टार्गेट करून ठार केले. याचाच अर्थ हा टार्गेट कीलींगचा प्रकार आहे. काश्मीरमध्ये टार्गेट किलिंगचा हा पहिलाच प्रकार आहे असे नाही. मागील वर्षी जम्मू काश्मीरच्या दिवसी जिल्ह्यातील कंदा परिसरात वैष्णवदेवीच्या दर्शनासाठी जात असलेल्या भाविकांच्या बसवर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला केला होता त्यात १० भाविक मरण पावले तर ३३ हून अधिक भाविक जखमी झाले होते. पहलगाम येथे झालेला हल्ल्याला गेल्या काही दिवसात काश्मीरमध्ये झालेला सर्वात मोठा भीषण हल्ला म्हणता येईल अर्थात काश्मीर खोऱ्यात कडेकोट बंदोबस्त असूनही लहान मोठे हल्ले चालूच होते मात्र या हल्ल्याने काश्मीरमध्ये पुन्हा दहशतवादी मोठ्या प्रमाणात सक्रिय झाल्याचे स्पष्ट झाले आहे. या हल्ल्याने दहशतवाद्यांनी केंद्र सरकारला दाखवून दिले आहे की काश्मीरमध्ये दहशतवाद अजूनही कायम आहे. केंद्र सरकारने हा हल्ला गांभीर्याने घेतला असून या हल्ल्याची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. भारताचे पंतप्रधान, गृहमंत्री, संरक्षणमंत्र्यांनी हा हल्ला पाकिस्तान पुरस्कृतच असून या हल्ल्याला जशास तसे उत्तर दिले जाईल असा इशारा दिला आहे. पाकिस्तानने



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

मात्र हे पाप आमचे नाही असे म्हटले आहे. पाकिस्तान काहीही म्हणो मात्र हा हल्ला पाकिस्तान पुरस्कृतच होता हे शाळकरी मुलेही सांगतील. सुंब जळाला तरी पिळ जात नाही ही म्हण पाकिस्तानसाठी तंतोतंत लागू पडते. पाकिस्तान आज अक्षरश: भिके कंगाल झाला आहे. पाकिस्तानी सरकार कटोरा घेऊन जगभर फिरत आहे मात्र त्यांना कोणीही भिक द्यायला तयार नाही . पाकिस्तानमधील जनता अक्षरश: देशोधडीला लागली आहे. एकवेळचे पोटभर अन्न मिळाले तरी पुरेसे अशी त्यांची अवस्था आहे. आपल्या देशातील नागरिकांना खायला मिळत नसताना तेथील सरकार मात्र दहशतवाद्यांना पोसत आहे. पाकिस्तान सरकार आजही दहशतवाद्यांना आर्थिक आणि लष्करी मदत करत आहे. पाकिस्तानच्या सीमावर्ती भागात आजही दहशतवाद्यांचे अड्डे सुरू आहेत. तिथे पाकिस्तानी लष्कर दहशतवादी संघटनांना प्रशिक्षण देत आहे. अनेक दहशतवादी संघटनांची कार्यालये पाकिस्तानात आहेत अशाच एका दहशतवादी संघटनेने हा भ्याड हल्ला केला असण्याची शक्यता आहे. केंद्र सरकारने या भ्याड हल्ल्याची गांभीर्याने दखल घेऊन पाकिस्तानला जशास तसे उत्तर द्यावे. जर भारताने या दहशतवादी हल्ल्याला प्रतिउत्तर दिले नाही तर दहशतवाद्यांची मुजोरी आणखी वाढेल आणि काश्मीरमध्ये पुन्हा दहशतवाद पसरेल. ते होऊ द्यायचे नसेल तर भारतानेही आक्रमक व्हायला हवे. प्रसंगी सर्जिकल स्ट्राईक सारखा पर्याय वापरायलाही हरकत नाही. भारताने पाकिस्तानला जशास तसे उत्तर देतानाच या दहशतवाद्यांना साथ देणाऱ्या फुटिरतावाद्यांचा देखील बंदोबस्त करावा. काश्मीरमधील अनेक फुटीरतावादी नेते दहशतवाद्यांना साथ देतात. स्थानिक फुटीरतावादी लोकांची साथ असल्याशिवाय इतका मोठा हल्ला करणे दहशतवाद्यांना शक्य नाही त्यामुळे दहशतवाद्यांशी दोन हात करताना आणि पाकिस्तानला जशास तसे उत्तर देतानाच केंद्र सरकारने ही फुटिरतावादी कीड देखील मुळापासून उखडून टाकायला हवी. आज जरी हा दहशतवादी हल्ला भारतात झाला असला तरी दहशतवाद ही केवळ भारताचीच समस्या नाही तर ती वैश्विक समस्या आहे. दहशतवाद आज जगातील प्रत्येक देशाचे दार ठोठावत आहे. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी जपान, रशिया, ऑस्ट्रेलिया या प्रगत देशांनाही दहशतवादाची झळ बसली आहे म्हणूनच दहशतवादाचा मुकाबला करायचा असेल तर जगातील सर्व देशांना एकत्र यावेच लागेल. पाकिस्तान सारखा देश जो सातत्याने दहशतवादाला प्रोत्साहन देतो, दहशतवाद्यांना मदत करतो अशा देशांवर आंतरराष्ट्रीय समूहाने कारवाई करावी. पाकिस्तान सारख्या दहशतवाद्यांना मदत करणाऱ्या देशांवर आंतरराष्ट्रीय समूहाने आर्थिक निर्बंध आणावेत. प्रसंगी त्या देशांवर बहिष्कार टाकून त्यांची कोंडी करावी. दहशतवाद्यांना मदत करणाऱ्या देशांची कोंडी केल्याशिवाय दहशतवाद संपणार नाही. अमेरिकेसारख्या सुपर पॉवर देशांनी त्यासाठी पुढाकार घ्यायला हवा.

***

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559